सूतगिरणीस सन १९६६ पासून ते सन १९८९पर्यंत एकूण ८१.१० लाख शासकीय भागभांडवल अदा करण्यात आलेले आहे.दि निळकंठ सहकारी सूतगिरणी मर्या., अकोला, जि. अकोला ही सूतगिरणी एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण, २०२३-२८ मधील तरतुदीच्या अनुषंगाने झोन-१ मध्ये येत असल्याने सदर सूतगिरणीची “खास बाब” म्हणून शासन अर्थसहाय्यासाठी ५:४५:५० या अर्थसहाय्याच्या गुणोत्तरानुसार निवड करण्यास दि.०६.१०.२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. सदर शासन निर्णयान्वये सूतगिरणीला शासनाने यापुर्वी दिलेले अर्थसहाय्य सूतगिरणीने एकरकमी परतफेड करणे बंधनकारक करण्यात आले आहे. वस्त्रोद्योग आयुक्तालयाच्या दि.०३.११.२०२६ रोजीच्या पत्रान्वये सूतगिरणीचा रु.७९९२.७९ लाख इतक्या किंमतीचा प्रकल्प अहवाल शासन निर्णयार्थ सादर करण्यात आला आहे. मा. मंत्री (वस्त्रोद्योग) यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सुकाणू समितीच्या दि.०४.११.२०२५ रोजीच्या बैठकीत दि निळकंठ सहकारी सूतगिरणी मर्या., अकोला, जि. अकोला या सूतगिरणीच्या ५:४५:५० या आकृतीबंधानुसार सूतगिरणीने शासनाने यापुर्वी दिलेल्या शासकीय अर्थसहाय्याची परतफेड करावी तद्नंतर रु. ७९९२.७९ लाख रकमेचा प्रकल्प अहवाल मंजूरीचा शासन निर्णय निर्गमित करण्यात यावा असा निर्णय झाला. दि निळकंठ सहकारी सूतगिरणी लि., अकोला, जि. अकोला या सूतगिरणीने दि. १५.११.२०२५ रोजी एकूण ८१.१० लाख शासकीय भागभांडवलाची परतफेड केलेली आहे.सबब, आता निळकंठ सहकारी सूतगिरणी मर्या., अकोला, जि. अकोला या सूतगिरणीच्या रु. ७९९२.७९ लाख इतक्या प्रकल्प अहवाल किंमतीस मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय :-

दि निळकंठ सहकारी सूतगिरणी मर्या., अकोला, जि. अकोला या सूतगिरणीचा समावेश दि.२६.१०.२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये "खास बाब" म्हणून शासन अर्थसहाय्यासाठी ५:४५:५० या अर्थसहाय्याच्या गुणोत्तरानुसार शासन अर्थसहाय्यासाठी निवड करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. सूतगिरणीच्या रु. ७९९२.७९ लाख इतक्या प्रकल्प अहवाल किंमतीच्या मर्यादेत त्या त्या बाबींसाठी मंजूर कमाल मर्यादेपेक्षा जास्त होणारा खर्च गिरणी स्वनिधी उभारुन करेल या अटीवर सदर सूतगिरणीच्या ५:४५:५० या आकृतीबंधानुसार रु. ७९९२.७९ लाख इतक्या प्रकल्प किंमतीस खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून त्याद्वारे शासन मान्यता देण्यात येत आहे.

१) सूतगिरणीच्या कामासाठी कालबध्द कार्यक्रम (Time bound Program) आखून घ्यावा व त्यानुसार सूतगिरणीची उभारणी विहित कालावधीत करावी.

२) शासन निर्णय दि.२४.३.१९९९ मधील सूतगिरणी परतफेडीस पात्र होण्याबाबतच्या अटीमध्ये दि.१०.०७.२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये सुधारणा करण्यात आली असून सदरची सुधारणा या सूतगिरणीसाठी बंधनकारक राहील.

३) सूतगिरणीस निधी उभा करण्यासाठी कोणती बैंक कर्ज देणार आहे, त्या बँकेचे कर्ज मंजूर करण्यात येत असल्याबाबतचे पत्र सादर करावे.

